

# अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत जाणार नाही - संजोग वाघेरे

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in | शनिवार दिनांक 05/04/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 73 ‖ RNI - MAHMAR51259 ‖ metrocity924@gmail.com

# ऐतिहासिक वेतन करार

## असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट, पुणे आणि महाराष्ट्र मजदूर संघटना




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : ट्रान्सपोर्ट आणि माथाडी कामगार देशाचा कणा आहे. त्यांच्यामुळेच दळणवळण व्यवस्था सक्षम आहे. त्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र मजदूर संघटना नेहमीच अग्रेसर असते. असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट, पुणे आणि महाराष्ट्र मजदूर संघटना यांच्यात नुकताच माथाडी कामगारांच्या पगारवाढीचा 'लेव्ही'सह 23 टक्के करार संपन्न झाला. हा करार जानेवारी 2025 पासून लागू झाला असून, कराराची मुदत तीन वर्ष आहे. या करारामुळे नक्कीच माथाडी कामगारांचे जिवनमान सक्षम होण्यास मदत होणार आहे, असे प्रतिपादन मजदूर संघटनेचे अध्यक्ष, कामगार तथा शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांनी केले आहे. निगडी येथील असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्टच्या कार्यालयात इरफानभाई सय्यद यांच्या नेतृत्वाखाली असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्टचे अध्यक्ष डॉ. दिलीप देशमुख, उपाध्यक्ष सुमित धुमाळ, जन.सेक्रेटरी अनुप जैन, खजिनदार - सतनामसिंग संधू, कार्याध्यक्ष गौरव कदम, माजी अध्यक्ष तथा सदस्य (AIMTCC) प्रमोद भावसार, माजी वरिष्ठ उपाध्यक्ष अशोक काळे, अध्यक्ष लीगल कमिटी तथा सहप्रतिनिधी दिल्ली अनिलकुमार शर्मा, ट्रस्टी जगराम चौधरी, संजय बारसे, सह खजिनदार सुभाष शर्मा, सह खजिनदार सुभाष शर्मा, सदस्य राजकुमार फडतरे, तेजस ढेरे, के.सी.शर्मा, के.पी.सिंग, आर.के. गुप्ता, विनोदजी जगजंपी, रोहतास चौधरी, सुनील कौशिक, नितीन जाधव, सुभाष धायल, रविंद्र शर्मा, प्रदीप नलावडे, आणि महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या पदाधिकारी यांनी वेतन करारावर स्वाक्ष-या केल्या. या करारामुळे कामगारांच्या पगारात घसघशीत वाढ होणार आहे. पिंपरी चिंचवड बोर्डातील सर्व कामगारांना याचा फायदा होणार आहे. त्यामुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत माहिती देताना इरफानभाई म्हणाले, महाराष्ट्र मजूर संघटना ही हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार व प्रेरणा घेऊन निर्माण झालेली संघटना आहे. कामगार हिताचे बाळकडू प्यायलेली ही संघटना केवळ कामगारांचे हित जपण्यातच धन्यता मानते. त्यामुळे कष्टकरी कामगार हे संघटनेकडे आपलेपणाने पाहतो. कामगारांची एकजूट ही आमची ताकद आहे. कामगार व उद्योजक हे एकमेकांवर अवलंबून असतात. कामगारांना कंपनी व्यवस्थापनाचे नेहमीच सहकार्य असते. दोघांमधील दुवा म्हणून महाराष्ट्र मजदूर संघटना काम करीत असते. यापुढील काळातही कामगार व प्रशासन यांनी एकत्रित राहून कंपनी व कामगारांचे हित जोपासण्यासाठी आमची संघटना कटिबध्द आहे. सदर कार्यक्रमाप्रसंगी असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट चे अध्यक्ष डॉ. दिलीप देशमुख म्हणाले की सौदर्हपूर्वक खेळीमेळीच्या वातावरणात करार संपूष्टात आल्याने कामगार आणि असोसिएशन चे एक्य या कराराने दिसून आले आहे पुढील काळात देखील हे दोन्हीही घटक एकमेकांच्या सहयोगाने आप-आपला विकास साधतील यात शंका नाही. हे वाहतूकदार आणि कामगार हे दोन्हीही घटक उद्योगाची दोन सक्षम चाके आहेत. तेंव्हा या दोघात समतोल असणे गरजेचे आहे. दरम्यान असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट पुणे आणि महाराष्ट्र मजदूर संघटना यांच्यामधील जुना करार 31 डिसेंबर 2024 रोजी संपुष्टात आला होता. त्यानंतर नवीन करार करुन असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट पुणे यांनी माथाडी कामगारांच्या वेतनात भरीव वाढ केली आहे. करारावर स्वाक्ष-या होताच कामगारांनी गुलालाची उधळण करीत कराराचे स्वागत केले.

यावेळी महाराष्ट्र मजदूर संघटनेचे कार्याध्यक्ष परेश मोरे, भिवाजी वाटेकर, पांडुरंग कदम, पांडुरंग काळोखे, प्रवीण जाधव, सर्जेराव कचरे, सतीश कंठाळे, अशोक साळुंखे, गोरक्ष दुबाले, विठ्ठल पठारे, श्रीकांत मोरे, अशोक साळुंके, उद्धव सरोदे, ज्ञानेश्वर पाचपुते, दादा कदम, बाबासाहेब पोते , कुमार हिंगे, रावसाहेब येवले,अमोल मदने, कैलास तोडकर, नागेश व्हनवटे, हनुमंत शिंदे, अमित पासलकर, समर्थ नायकवडे, बबन काळे, ज्ञानेश्वर घनवट, आदी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड माथाडी मंडळाचे चेअरमन निखिल वाळके, सचिव श्रीमती सविता धोत्रे, निरीक्षक संतोष जाधव, लेखापाल सौ. सुरेखा यादव व इतर कर्मचा-यांचे देखील सय्यद यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री साकोरे तर आभार अनिल शर्मा यांनी मानले.

> **" अनेक वर्षातील हा सर्वात मोठा वेतनवाढ करार आहे. औद्योगिक शांतता जपत आणि अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हा वेतनवाढ करार संपन्न झाला. असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट पुणे यांनी आमच्या सर्व मागण्या मान्य केल्या. दोन आठवड्यातच हा करार संपन्न आहे. त्याबाबत संघटनेच्या वतीने ट्रान्सपोर्ट असोसिएशनचा मी आभारी आहे. कराराची प्रत औद्योगिक कंपन्यांना देण्याची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे."**
>
> **- मा. इरफानभाई सय्यद, कामगार तथा शिवसेना उपनेते...**

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरण ; उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आदेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत






पुणे : पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीने उपचार न मिळाल्याने तनिषा भिसे या भगिनीला आपला प्राण गमवावा लागला. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून, शासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

या दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतची संपूर्ण माहिती घेतली आहे. आरोग्य विभागाने तातडीने, पारदर्शक आणि निष्पक्षपणे चौकशी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रुग्णालय प्रशासनाने माध्यमांसमोर त्यांचे म्हणणे मांडले असले, तरी शासन या प्रकरणाचा सर्व संबंधित घटकांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करेल. या घटनेबाबत आंदोलन करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि संघटनांच्या भावना शासनाने समजून घेतल्या आहेत. चौकशीच्या निष्कर्षानुसार दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. सर्व नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (SSB) या परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे नवयुवक व नवयुवतींसाठी 5 मे ते 14 मे 2025 या कालावधीत एस.एस.बी. कोर्स आयोजित करण्यात येत आहे.

या एस.एस.बी. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावेत.



कंम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSC) अथवा नॅशनल, डिफेन्स अकॅडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी 'C' सर्टिफिकेट 'A' किंवा 'B' ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबी साठी शिफारस केलेल्या यादीत नांव असावे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

तरी, पुणे जिल्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी मिळविण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय पुणे येथे दिनांक 1 मे 2025 रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune यांच्या वेबसाईट www.mahasainik.maharashtra.gov.in वर सर्च करून त्यामधील SSB-61 कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परीशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरून तीन प्रती सोबत घेऊन यावे.

अधिक माहीतीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आय डी training.pctenashik@gmail.com व दुरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाटसअप क्र. ९१५६०७३३०६ येथे कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन, लेफ्टनंट कर्नल हंगे स.दै. (नि.), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

# स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीचा पदवी प्रदान सोहळा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : फॅशन जगतासाठी भारत ही जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असून येथील परंपरा, साजरे होणारे जगातील सर्वाधिक सण, येथील हवामान आणि जनतेच्या गरजा, आर्थिक स्थिती लक्षात घेऊन त्याप्रमाणे कपडे, दागिने आदींची निर्मिती करावी, असे सांगतानाच या मोठ्या बाजारपेठेचा या क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थिनींनी लाभ घ्यावा, असा सल्ला वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी दिला.महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीच्या २२ व्या पदवी प्रदान समारंभात ते बोलत होते. यावेळी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे विश्वस्त आणि स्कूलचे स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य मिलिंद लेले, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या विकास कक्षाच्या सदस्य डॉ. मंजू हुंडेकर, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य जयंत इनामदार, स्कूलच्या



स्थानिक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती मोहना कदम, प्राचार्य डॉ. गरिमा भल्ला आदी उपस्थित होते.मंत्री सावकारे पुढे म्हणाले, भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश असून त्यातील आपला ग्राहक कोणता हे निश्चित करून आणि त्यांच्या गरजा, मागणींचा अभ्यास करून फॅशन व्यवसाय, उद्योगात निर्मिती करावी. विद्यार्थिनींनी स्पर्धेच्या युगात प्रथम स्वतःला या क्षेत्रात स्थैर्य मिळविताना काही वेगळे करण्याचा, सर्जनशीलतेचा प्रयत्न करावा. भारतीय परंपरेमध्ये प्रत्येक सण, उत्सवाला काही ना काही शास्त्रीय आधार असून या परंपरेला पुढे आणल्यास तुमचीही प्रगती होईल. आपण जे करू ते देशासाठी करू या विचाराने प्रेरित व्हावे, असेही ते म्हणाले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा शाश्वतता या संकल्पनेवर मोठा भर आहे. प्रत्येक वस्तूचा पुनर्वापर करून नवनिर्मिती करत या संकल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी संस्थेने स्थापनेपासूनच केली आहे. त्यातून महर्षी कर्वे यांची दूरदृष्टी दिसून येते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.श्री. सावकारे पुढे म्हणाले, केंद्र शासनाने टेक्निकल टेक्सटाइल ही नवी संकल्पना समोर आणली असून त्यात वस्त्रोद्योगात वापरल्या जाणारे रंग (डाय) बनविणाऱ्या यंत्रांसाठी अनुदान देण्यात येते.

राज्य शासन देखील या संकल्पनेला पुढे घेऊन काम करत आहे.रेशमाचा धागा तेवढ्याच जाडीच्या लोखंडाच्या धाग्यापेक्षा अनेक पटीने मजबूत तरीही वजनाने हलका असल्याने सैनिकांसाठी बुलेटप्रूफ जॅकेट बनविण्यासाठी त्याचा उपयोग करण्याबाबत संशोधन सुरू आहे. अशा अनेक नवनव्या संधी या क्षेत्रात निर्माण होत असून त्यांचा लाभ घ्यावा, असेही ते म्हणाले.प्राचार्य गरिमा भल्ला यांनी संस्थेचा अहवाल सादर केला, त्या म्हणाल्या, ही संस्था फॅशन डिझाइन क्षेत्रातील देशातील एक अग्रमानांकित संस्था आहे.

आजच्या पदवी प्रदान सोहळ्यात संस्थेमार्फत ५ सुवर्ण पदके, १९५ बी. डिझाइन पदवी आणि ११ एम. डिझाइन या पदव्युत्तर पदवी प्रदान करण्यात येत आहेत. संस्थेने मँचेस्टर मेट्रोपॉलिटन विद्यापीठ, डी मॉन्टफर्ड आदी विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार केले आहेत. संस्थेतील विद्यार्थीनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय फॅशन डिझाईन स्पर्धांमध्ये सहभागी घेऊन यशस्वी झाल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.यावेळी ग्रीन फॅशन इंडिया परिषदेचा अहवाल सादर करण्यात आला.या प्रसंगी प्राध्यापक, पालक, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 05/04/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# सिंबायोसिस स्किल्स अ‍ॅन्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे भव्य यश!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, सिंबायोसिसि स्कल्स अ‍ॅन्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (एसएसपीयु) मध्ये ह्याकॅथॉन १.० यशस्वीपणे पूर्ण झाले. ८ तासांचा कॅप्चर द फ्लॅग Capture The Flag (CTF) चॅलेंज, ज्यात ४००+ उत्साही विद्यार्थी सहभागी झाले होते, एसएसपीयुच्या विद्यार्थ्यांनी उत्तम प्रदर्शन करत, विजेता: ₹२५,०००, प्रथम उपविजेता: ₹१५,०००, द्वितीय उपविजेता:




₹१०,००० अशी बक्षीशे जिंकली. तंत्रज्ञान आणि उत्साहाच्या वातावरणाने तज्ज्ञ, प्रायोजक आणि सहभागी यांना एकत्र आणले. या कार्यक्रमात नामवंत वक्त्यांनी — अरुण माने, ऋषिका डी., आदित्य शेंडे, शिफा सायकलवाला, रोहित गौतम, यश चव्हाण, अभिषेक भास्कर, आणि ओंकार माळी यांनी अतिशय प्रेरणादायक आणि विचारप्रवर्तक सत्रे घेतली. त्यांच्या सत्रांनी विविधि वषयांची समृद्ध माहिती दिली.

"आम्हाला ह्याकॅथॉन १.० आयोजित करण्याचा खूप अभिमान आहे, असे कार्यक्रम आमच्या विद्यार्थ्यांच्या कौशल्यांमध्ये भर घालतात. हे कार्यक्रमि शक्षण आणि सहकार्या असे दोन्हीचे महत्व मुलांना पटवून देतात."

# भारतीय नौदलात नाविक भरतीसाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : भारतीय नौदलात वरिष्ठ माध्यमिक भरती (वैद्यकीय) अंतर्गत वैद्यकीय शाखेत नाविक म्हणून नाव नोंदणीसाठी अविवाहित पुरुष उमेदवारांना https://www.joinindiannavy.gov.in या संकेतस्थळावर १० एप्रिलपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



भारतीय नौदल प्रवेश परीक्षा २०२५ साठी वरिष्ठ माध्यमिक भरती (वैद्यकीय) च्या ०२/२०२५, ०१/२०२६ आणि ०२/२०२६ बॅचसाठी हे अर्ज मागविण्यात आले आहेत. यासाठी उमेदवार हा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या मान्यताप्राप्त शालेय शिक्षण मंडळांकडून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांसह एकूण ५० टक्के आणि प्रत्येक विषयात किमान ४० टक्के गुणांसह बारावी परीक्षा उत्तीर्ण असावा. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या बारावी परीक्षेत बसणारे उमेदवार देखील अर्ज करण्यास पात्र आहेत.अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय पुणे येथे संपर्क साधावा असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि.) यांनी केले आहे.

# टू व्हीलर बाइक टॅक्सीला प्राणपणाने तीव्र विरोध करू : बाबा कांबळे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : महाराष्ट्र सरकारने पुणे, पिंपरी चिंचवड मुंबईसह महाराष्ट्रातील एक लाख लोकसंख्यापेक्षा अधिक असलेल्या शहरांमध्ये, टू व्हीलर टॅक्सी सुरू करण्यास मान्यता दिली आहे.

यामुळे आधीच आर्थिक अडचणी मध्ये असलेले रिक्षा व टॅक्सी चालक यांच्या व्यवसायावर परिणाम होणार आहे. त्यांचे जगणे मुश्किल होईल.

यामुळे सरकारने हा निर्णय मागे घ्यावा. रिक्षा चालक मालकांचे इतरही प्रश्न सोडवावेत, अशी मागणी रिक्षा चालक मालकांच्या वतीने करण्यात आली.महाराष्ट्र रिक्षा पंचायत, "ऑटो टॅक्सी चालक-मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र राज्य, ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशनच्या (दिल्ली) वतीने कष्टकऱ्यांचे नेते बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आरटीओच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

या वेळी मागणी करण्यात आली. पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेश आव्हाड यांना निवेदन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र रिक्षा पंचायत पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष संतोष गुंड ,जिल्हाध्यक्ष लक्ष्मण शेलार, युवक अध्यक्ष शुभम तांदळे, विशाल ससाने, विनायक ढोबळे, अविनाश जोगदंड, सुरज सोनवणे, अनिल शिरसाट, प्रदीप आयर, मंगेश गवळी, सलीम पठाण, सागर लोंढे,विजय जावळे, संदिप कुडुंज, सोपान



पवळे, रोहिदास पिंगळे, आकाश गालदर, आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बाबा कांबळे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये 2017 पर्यंत फक्त पाच हजार रिक्षा परवाने होते.

सरकारच्या मुक्त रिक्षा परवानामुळे आता पिंपरी चिंचवड शहरामंध्ये 45 हजार रिक्षा परवाने मिळाले असून 45 हजार रिक्षा रस्त्यावर आले आहेत. याचप्रमाणे पुणे शहरांमध्ये 40 हजार रिक्षा होत्या. त्यात वाढ होऊन आता एक लाख वीस हजार रिक्षा झाले आहेत.

अगोदरच रिक्षाची संख्या वाढल्यामुळे प्रवासी कमी आणि रिक्षा जास्त अशी परिस्थिती झाली आहे.

यामुळे प्रवासी मिळत नाहीत.

रिक्षा चालकांना आपले हप्ते भरणे, संसाराची उपजीविका भागवणे, मुलांचे शिक्षण व इतर जीवन आवश्यक गरजा भागवणे अवघड झाले आहे. ते अगोदरच आर्थिक संकटामध्ये आहेत. त्यांचे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत. महाराष्ट्र सरकारने टू व्हीलर टॅक्सीला परवानगी दिल्यास रिक्षा टॅक्सी व त्या व्यवसाय पूर्णपणे संपून जाईल. नवीन रोजगार निर्माण करण्याच्या सवंग घोषणेमुळे ज्यांना अगोदर परवाना देऊन रोजगार दिला आहे.

त्यांचे मात्र वाटोळे होईल हे सरकारी लक्षात घेतले पाहिजे.

यामुळे तातडीने सरकारने टू व्हीलर टॅक्सीला दिलेली मान्यता रद्द करावी, अशी मागणी यावेळी आम्ही निवेदनाद्वारे केली आहे असे बाबा कांबळे म्हणाले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 05/04/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत जाणार नाही - संजोग वाघेरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजोग वाघेरे यांनी आपण अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.काही दिवसापासून संजोग वाघेरे हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याच्या चर्चा शहरात होत होत्या याबाबत प्रश्न विचारल्या नंतर प्रसार माध्यमांना सांगताना संजोग वाघेरे यांनी सांगितले की आपण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात राहूनच आगामी आपली राजकीय वाटचाल करणार असून आता आपण इतर कोणत्याही पक्षात प्रवेश करणार नाही तर आगामी महानगरपालिका निवडणूक ही स्वबळावर लढविणार असल्याचे भाष्य संजोग वाघेरे यांनी केले.अजित पवार यांचे खंदे समर्थक समजले



जाणारे माजी महापौर तथा राष्ट्रवादी पक्षाचे माजी शहराध्यक्ष राहिलेले संजोग वाघेरे यांनी मागील लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करून मावळ लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढवली परंतु या निवडणुकीत त्यांना अपयशाला सामोरे जावे लागले होते , त्यानंतर त्यांनी पिंपरी चिंचवड शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष वाढविण्यासाठी काम सुरू केले व आगामी महानगरपालिका निवडणूक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हा स्वबळावर लढणार असल्याचे सांगितले.

व याबाबत पक्षाचे प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनाही कळविण्यात आले असल्याचे संजोग वाघेरे यांनी सांगितले आहे.

# आरोग्य व वैद्यकीय विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना आरोग्य विमा द्या

## - महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सायली नढे यांची महापालिका आयुक्तांकडे मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : (प्रतिनिधी) - महापालिकेच्या आरोग्य विभाग व वैद्यकीय विभागामधील कंत्राटी कामगारांना आरोग्य विमा कवच तसेच महापालिकेच्या सर्व हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार मिळावेत. अशी मागणी पिंपरी चिंचवड महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सायली नढे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.

याबाबत नढे यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी



चिंचवड शहराची लोकसंख्या खूप झपाट्याने वाढत आहे, ते पाहता महापालिकेने वैद्यकीय सेवा व आरोग्य सेवांमध्ये बदल करून कंत्राटी कामगारांची संख्या वाढवली आहे. त्यामुळे नागरिकांना सेवा प्रदान करण्यामध्ये कोणतीही अडचण येत नाही. वैद्यकीय सेवा व आरोग्य सेवा हे अत्यावश्यक सेवेमध्ये येतात. तसेच सर्व कंत्राटी कामगार आपल्या जीवाची परवा न करता शहरातील नागरिकांना आरोग्य सेवा व वैद्यकीय सेवा प्रदान करतात. अशातच निसर्गामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे संसर्गजन्य रोग निर्माण होतात, त्यामुळे कामगारांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरामध्ये महापालिकेत वैद्यकीय सेवा व आरोग्य सेवामध्ये कंत्राट पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सर्व महानगरपालिका हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार मिळावेत. तसेच अनेक शस्त्रक्रिया व तपासणी महानगरपालिका रुग्णालयामध्ये होत नाहीत. त्यामुळे या कामगारांना खूप अडचणी निर्माण होतात. त्याकरिता सर्व कंत्राटी कामगारांना सुरक्षा विमा कवच देण्यात यावे. असे अध्यक्षा सायली नढे यांनी निवेदनात नमुद केले आहे. यावेळी माजी सभापती शिक्षण मंडळ अभिमन्यू दही तुले, स्वाती शिंदे, प्रियंका सगट,आशा भोसले, प्रज्ञा जगताप,आबा खराडे उपस्थित होते

# नियम न पाळणाऱ्या रुग्णालयांची जागा सरकारने ताब्यात घ्यावी

## - आमदार शंकर जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत






पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात डिपॉझिट्च्या कारणावरून उपचार न मिळाल्याने गरोदर महिलेच्या मृत्यूच्या प्रकरणावर आमदार शंकर जगताप यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, धर्मादाय रुग्णालयांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, याबाबत सरकारने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. पुण्यातील धक्कादायक घटना पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचारासाठी दाखल होऊ न दिल्याने एका अत्यवस्थ गरोदर महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. डिपॉझिटची रक्कम भरली नसल्यामुळे तातडीने उपचार न मिळाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण राज्यभर संतापाची लाट उसळली असून, रुग्णालय प्रशासनाच्या असंवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे आमदार जगताप यांची तीव्र संतप्त प्रतिक्रिया या घटनेबाबत चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "घडलेली घटना जितकी दुर्दैवी आहे, तितकीच संतापजनक आहे. अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर तातडीने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. आमदार जगताप यांनी पुढे बोलताना धर्मादाय रुग्णालयांच्या कारभारावरही गंभीर प्रश्न उपस्थित केले. "फक्त दीनानाथ मंगेशकर रुग्णालयच नव्हे, तर इतर धर्मादाय रुग्णालयांचीही निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच, या प्रकरणात दोषी आढळलेल्या डॉक्टरांवर कठोर कारवाई केली पाहिजे," अशी मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी नेमली चौकशी समिती या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ चौकशी समिती नेमून आवश्यक पावले उचलली आहेत. "मला पूर्ण विश्वास आहे की, या प्रकरणात दोषींवर कोणतीही गय केली जाणार नाही," असे आमदार जगताप यांनी स्पष्ट केले. डिपॉझिट्च्या प्रथेबाबत नवा नियम आवश्यक या घटनेच्या निमित्ताने रुग्णांना दाखल करताना मागवण्यात येणाऱ्या डिपॉझिट्च्या अटीवरही गंभीर चर्चा सुरू झाली आहे. "अनेक रुग्ण आर्थिक कारणांमुळे वेळेत उपचार मिळवू शकत नाहीत, त्यामुळे सरकारने नवीन नियमावली तयार करून तातडीने कारवाई करणे गरजेचे आहे," असे मत आमदार जगताप यांनी व्यक्त केले.शासकीय नियमांचे पालन न करणाऱ्या धर्मादाय रुग्णालयांवर कारवाई करण्याची मागणी करत आमदार जगताप यांनी ठाम भूमिका घेतली आहे. "जर रुग्णालये नियमांचे पालन करत नसतील, तर त्यांच्या जागा सरकारने पुन्हा ताब्यात घ्याव्यात, अशी जनभावना आहे, आणि मीही याच मताचा आहे," असे त्यांनी ठणकावून सांगितले.